155 (115) (128)

सामाजिक न्याय विभागांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शासकीय/ अनुदानित संस्थांना देण्यात येणा-या डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कारासाठी नियमावली.

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र. पुरस्कार-२०१७/प्र.क्र.१९४/समन्वय
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १९ एप्रिल, २०१८

श्री० जादव / पुरस्कार

वाचा:- १) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच२००३/प्र.क्र.४७८/मावक-४, दि. १३ ऑक्टोबर, २००३
२) शासन शुध्दीपत्र सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच २००३/प्र.क्र. ४७८/मावक-४, दि. २९ नोव्हेंबर, २००३
३) शासन शुध्दीपत्रक बीसीएच २००३/प्र.क्र.४७८/मावक-४, दि. ३१ डिसेंबर, २००३

प्रस्तावना :-

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग कल्याण इत्यादी क्षेत्रात मौलीक काम करणाऱ्या समाज सेवकांच्या कामाची नोंद घ्यावी व इतरांना त्यांच्यापासून प्रेरणा, उत्तेजन व प्रोत्साहन मिळावे यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड व संत रविदास यांच्या नावांचे पुरस्कार देण्यात येतात.

मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणासाठी अधिकाधिक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्या, त्यांना शासनाकडून देण्यात येणा-या सवलतींचा लाभ मिळावा याकरिता अनुदानित वसतीगृहे, शासकीय वसतीगृहे, निवासी शाळा इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात. तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा निवास व भोजनाचा प्रश्न सुटावा म्हणून शासकीय व अनुदानीत वसतीगृहे सुरू करण्यात आली आहेत. उपरोक्त मौलिक कार्य करणाऱ्या संस्थांचा दर्जा सुधारावा, प्रवेशितांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी या उद्देशाने विविध शासकीय / अनुदानित संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत विविध शैक्षणिक संस्थांना (अनुदानित/शासकीय) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्काराने गौरविण्यात येते. राज्यस्तरावर गुणानुक्रमे तीन संस्थाना प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार तसेच, विभागीय स्तरावरावर प्रत्येक प्रवर्गातील एका संस्थेला पुरस्कार देण्यात येतो.

सदरचे पुरस्कार संस्थांची तपासणी करून व मुल्यांकनाच्या आधारे देण्यात येतात. सदर तपासणी आणि मुल्यांकनामध्ये सुलभता यावी याकरिता संदर्भातील शासन निर्णय रद्द करून सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

सदर पुरस्काराचे नांव **"डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार"** असे असेल. पुरस्कारासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या खालील प्रवर्गाच्या संस्थांमधून सर्वोत्तम संस्थांची निवड करण्यात येईल.

अ. अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतीगृहे.

ब. अनुसूचित जातीच्या मुलांमुलींसाठी निवासी शाळा / आश्रमशाळा.

क. अनुसूचित जातीच्या मुला-मुलींची अनुदानित वसतीगृहे.

**२. राज्यस्तरीय पुरस्कार:-**

संपूर्ण राज्यात गुणवत्तेच्या आधारे उत्कृष्ट ठरणाऱ्या शासकीय / अनुदानित संस्थेस देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

(अ) प्रथम पारितोषिक रू. ५,००,०००/- (रूपये पाच लाख)

(ब) द्वितीय पारितोषिक रू. ३,००,०००/- (रूपये तीन लाख)

(क) तृतीय पारितोषिक रू. २,००,०००/- (रूपये दोन लाख)

**३. विभागस्तरीय पुरस्कार:-**

प्रत्येक महसुली विभागात गुणवत्तेच्या आधारे उपरोक्त तीन प्रवर्गामधून प्रत्येकी एक अशा एकूण तीन संस्थांना प्रत्येकी रू. १,००,०००/- प्रमाणे पुरस्कार देण्यात येईल. एका विभागातील तीन संस्था याप्रमाणे सहा महसुली विभागाकरीता एकूण १८ पुरस्कार दिले जातील. कोणतीही संस्था एकाच वेळी दोन पुरस्कार मिळण्यासाठी पात्र नसेल.

४. तपासणी करून पुरस्कार देण्याकरिता पुढीलप्रमाणे समित्या गठीत करण्यात येत आहेत.

अ) **विभागीय स्तरावरील समिती:-** जिल्हास्तरावरुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी, विभागीय स्तरावरील समितीकडून करण्यात येईल. एका विभागातील संस्थांची तपासणी अन्य विभागातील समितीकडून करण्यात येईल. यासंदर्भातील सूचना समाज कल्याण आयुक्तालयाच्या स्तरावरुन देण्यात येतील. विभागीय स्तरावरील तपासणी समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल.

| अ.क्र. | पदाधिकारी हुद्दा | पद |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग | अध्यक्ष |
| २ | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (विभागातील) | सदस्य |
| ३ | सहाय्यक संचालक (लेखा) | सदस्य |
| ४ | समाज कल्याण निरिक्षक (विभागातील कोणताही) | सदस्य सचिव |

ब) **राज्यस्तरीय निवड समिती:-** जिल्हा स्तरावरुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी विभागीय स्तरावरील समितीकडून होवून त्याचा अहवाल आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्याकडे पाठविण्यात येईल. सदर प्रस्तावांमधून राज्य व विभागीय स्तरावरील पुरस्कारांसाठी निवड करण्यात येईल. समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | अध्यक्ष |
| २ | मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ४ | आयुक्त,समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ५ | सह सचिव /उप सचिव, सामाजिक न्याय व सहाय्य विशेष विभाग | सदस्य सचिव |

i) एकूण गुणांकन १०० गुणांचे असेल.

ii) विभागीय स्तरावरील समितीकडून ८० पैकी गुण देण्यात येतील.

iii) राज्यस्तरीय निवड समितीकडून गुणवत्तेच्या आधारे, कारणे नमूद करुन उर्वरित २० पैकी गुण देण्यात येतील.

iv) राज्यस्तरावरील प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यात येईल. विभागीय स्तरावर प्रत्येक महसूली विभागात, प्रत्येक प्रवर्गात प्रथम येणारी एक संस्था याप्रमाणे ३ संस्थांची निवड करण्यात येईल. म्हणजेच राज्यस्तरावर ३ पुरस्कार व विभागीय स्तरावर १८ पुरस्कारांसाठी संस्थांची निवड करण्यात येईल.

५. तपासणीचे निकष:-

I) मागासवर्गीय मुलामुलींकरीता शासकीय वसतिगृह गुणवत्ता तपासणीचे निकष **"परिशिष्ट अ"** मध्ये विहित करण्यात आले आहेत.

II) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलांमुलींसाठी निवासी शाळा / आश्रमशाळा गुणवत्ता तपासणीचे निकष **"परिशिष्ट ब"** मध्ये विहित करण्यात आले आहेत.

III) मागासवर्गिय मुलांमुलीकरीता शासनमान्य अनुदानित वसतीगृह गुणवत्ता तपासणीचे निकष सोबतच्या **"परिशिष्ट क"** मध्ये विहित करण्यात आले आहेत.

IV) पुरस्कारासाठी खर्चाची पध्दत **"परिशिष्ट ड"** मध्ये विहित करण्यात आली आहे.

V) पुरस्कारासाठी होणाऱ्या खर्चाचा तपशिल **"परिशिष्ट इ"** मध्ये विहित करण्यात आला आहे.

६. पुरस्कार वितरण समारंभ:-

पुरस्कारांचे वितरण शासनाने ठरविलेल्या ठिकाणी, विशेष सार्वजनिक समारंभाचे आयोजन करून, मा. राज्यपाल /मा. मुख्यमंत्री /मा. केंद्रिय मंत्री /मा. मंत्री / प्रतिष्ठित व्यक्ती यांच्या हस्ते

करण्यात येईल. पुरस्कारांतर्गत देण्यात येणा-या प्रमाणपत्रावर विभागाचे मंत्री व विभागाचे सचिव यांच्या स्वाक्षऱ्या असतील. पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष / उपाध्यक्ष यांना देण्यात येईल. शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा व आश्रमशाळेसाठी देण्यात येणारा पुरस्कार संबंधित संस्थेच्या प्रमुखांना देण्यात येईल.

**७. पुरस्काराच्या रकमेचा विनियोग:-**

पुरस्काराची रक्कम संबंधित संस्थेच्या शैक्षणिक विकासासाठीच खर्च करता येईल. त्याकरिता जिल्हास्तरावर पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण | अध्यक्ष |
| २ | सहाय्यक संचालक (लेखा), प्रादेशिक उपायुक्त, कार्यालय | सदस्य |
| ३ | संबंधित संस्थेचे अध्यक्ष / उपाध्यक्ष / ग्रहपाल / गृहप्रमुख / मुख्याध्यापक | सदस्य सचिव |

समितीने वित्तीय नियमांचे पालन करुन खर्च करावा.

**८. संकिर्ण नियम:-**

i) जिल्हा स्तरावरुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी करताना दोन संस्थांना समान गुण प्राप्त झाल्यास त्यापैकी एका संस्थेची निवड विभागीय स्तरावरील समितीकडून चिठ्ठी पध्दतीने करुन संस्थेचे नामनिर्देशन करण्यात येईल.

ii) अंतिम निवडीच्या वेळी समान गुण प्राप्त झाल्यास राज्यस्तरीय निवड समितीकडून पुरस्काराची रक्कम संस्थांना विभागून देण्यात येईल.

iii) राज्य स्तरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळणारी संस्था कोणत्याही स्तरावरील स्पर्धेमध्ये पुढील पाच वर्षे सहभागी होऊ शकणार नाही. मात्र विभागीय स्तरावर पुरस्कारासाठी निवड केलेल्या संस्थेचा राज्यस्तरीय पुरस्कारासाठी विचार करण्यात येईल.

iv) संस्थेचे संचालक / विश्वस्तांविरूध्द फौजदारी, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा दाखल असल्यास तसेच, संस्थेने यापूर्वी अनुदानाचा गैरवापर केल्याचे निष्पन्न झाले असल्यास, अशी संस्था पुरस्कारास पात्र राहणार नाही.

v) राज्यस्तरीय समितीने दिलेला निर्णय अंतिम असेल.

९. प्रस्तुत प्रकरणी आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संविरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याकरिता होणारा खर्च "२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ८००- इतर खर्च, (०१) मागासवर्गीयांना अनुदाने, (०१) (०१) सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील उत्कृष्ट

संस्थांना बक्षिसे देणे (अ. जा. उ. यो.) (२२२५-३२४-२) कार्यक्रम, ०५- बक्षिसे" या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४१९१७२६१९५४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd834467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2018.04.19 17:27:56 +05'30'

(दि. रा. डिंगळे)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत:-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४) सर्व. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
५) सर्व. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व विभागीय सचिव, मंत्रालय, मुंबई / सर्व जिल्हा परिषद, अध्यक्ष.
८) सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी.
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
११) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) सर्व उपायुक्त (विकास) /सर्व सहाय्यक आयुक्त, विकास
१३) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी / सर्व जिल्हा माहिती व प्रसिध्द अधिकारी.
१४) सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी / सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी.
१५) सर्व समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद.
१६) कार्यासन, विघयो-१, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) महालेखापाल, महाराष्ट्र ½, मुंबई, नागपूर.
२०) अधि व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
२१) जिल्हा कोषाधिकारी, पुणे , जि. पुणे.
२२) निवड नस्ती, समन्वय.

160

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार**
**शासन निर्णय क्र. पुरस्कार-२०१७/प्र.क्र.१९४/समन्वय, दि. १९ एप्रिल, २०१८ चे**
**परिशिष्ट — अ**

**अनुसूचित जातीच्या मुलामुलींकरिता शासकीय वसतीगृह गुणवत्ता तपासणी निकष**

**अ) शासकीय संस्थेचे नांव व पत्ता :**

**ब) वसतीगृह : शासकीय**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश स्थिती / पटसंख्या | १. मान्य संख्येच्या ९१% ते १००% प्रवेश देण्यात आल्यास | १० गुण |
| | | २. मान्य संख्येच्या ७५ ते ९०% प्रवेश देण्यात आल्यास | ८ गुण |
| | | ३. मान्य संख्येच्या ५१ ते ७४ % प्रवेश देण्यात आल्यास | ७ गुण |
| | | ४. मान्य संख्येच्या ५०% पर्यंत प्रवेश देण्यात आल्यास | ५ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| २ | उपस्थिती | १. मान्य संख्येच्या ९०% पेक्षा अधिक उपस्थिती असल्यास | १० गुण |
| | | २. मान्य संख्येच्या ७५ ते ८९% उपस्थिती असल्यास | ८ गुण |
| | | ३. मान्य संख्येच्या ६० ते ७४% उपस्थिती असल्यास | ६ गुण |
| | | ४. मान्य संख्येच्या ५० ते ५९% उपस्थिती असल्यास | ४ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ३ (अ) | भाडयाची इमारत | १. मान्य संख्येच्या प्रमाणात पुरेशी व सर्वसोयींनी युक्त असल्यास. | १० गुण |
| | | २. मान्य संख्येनुसार पुरेशी नाही परंतु, सर्व सुविधांनी युक्त असल्यास | ६ गुण |
| | | ३. मान्य संख्येच्या प्रमाणात पुरेशी नाही, सोयीसुविधांचा अभाव परंतु सुधारणेस वाव असल्यास | ४ गुण |
| | | ४. मान्य संख्येच्या प्रमाणात अपुरी, सोयी सुविधांचा अभाव तसेच, सुधारणेस वाव नसल्यास. | २ गुण |
| | | **किंवा** | |
| ३ (ब) | शासकीय इमारत | १. दुरूस्ती व रंगरंगोटी वेळेवर केली जात असल्यास. | ३ गुण |
| | | २. सर्व सोयीसुविधांनी युक्त (कॉट,टेबल, खुर्ची , डायनिंग टेबल इ.) | ३ गुण |
| | | ३. सर्व जागेचा वापर विहित कारणासाठी केला जात असल्यास. | १ गुण |
| | | ४. सभोवतालची मोकळी जागा व परीसर सुशोभित (बागबगीचा, झाडे इत्यादी)असून, त्याची नियमितपणे निगा राखली जात असल्यास. | ३ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ४ | भोजन व्यवस्था | १. नियमानुसार वरण, भात, भाजी, पोळी, मिष्टान्न देत असल्यास | १० गुण |
| | | २. नियमानुसार वरण, भात, भाजी, पोळी, मिष्टान्न या पैकी एक बाब कमी असल्यास | ८ गुण |

161
(113)
(131)

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३. नियमीत भोजनात भाजी व पोळी, किंवा भात व भाजी देत असल्यास | ७ गुण |
| | | ४. भोजन अपुरे व नेहमीच भात किंवा पोळी भाजी देत असल्यास | ५ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ५ | सोयी सुविधा | १. नियमानुसार सर्व सोयी सुविधा पुरविल्या असल्यास | १० गुण |
| | | २. नियमानुसार सोयी सुविधांपैकी एखादी बाब कमी दिली असल्यास | ८ गुण |
| | | ३. ५०% सोयी सुविधा पुरविल्या असल्यास | ६ गुण |
| | | ४. नियमानूसार ५०% पेक्षा कमी सोयी सुविधा देण्यात आल्यास | ४ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ६ | अभिलेख (रेकॉर्ड) | १. रेकॉर्ड परिपूर्ण व उपलब्ध असल्यास | ५ गुण |
| | | २. रेकॉर्ड उपलब्ध असून त्यामध्ये त्रुटी असल्यास | ३ गुण |
| | | ३. रेकॉर्ड अपूर्ण व त्यामध्ये त्रुटी असल्यास | २ गुण |
| | | ४. रेकॉर्ड नसणे, अपुरी माहिती व त्रुटी आढळून आल्यास | ० गुण |
| | एकूण गुण ५ | | |
| ७ | स्वच्छता | १. अतिउत्कृष्ट | ५ गुण |
| | | २. उत्कृष्ट | ४ गुण |
| | | ३. सर्वसाधारण | २ गुण |
| | | ४. स्वच्छतेचा अभाव असल्यास | ० गुण |
| | एकूण गुण ५ | | |
| ८ | ग्रंथालय / वाचनालय | १. अद्यावत ग्रंथालय, संदर्भ पुस्तके व अवांतर वाचन साहित्य असल्यास | १० गुण |
| | | २. अवांतर वाचनासाठी अद्यावत ग्रंथालय आहे परंतु, साहित्य नसल्यास | ८ गुण |
| | | ३. कमी साहित्य उपलब्ध असल्यास | ६ गुण |
| | | ४. वाचन साहित्य, ग्रंथ पुरेसे नसल्यास | ४ गुण |
| | एकुण गुण १० | | |
| ९ | इतर उपक्रम | १. खेळांच्या स्पर्धा आयोजित करणे | २ गुण |
| | | २. निबंध, वकृत्व स्पर्धांचे आयोजन करणे | २ गुण |
| | | ३. मान्यवरांचे मार्गदर्शन घेण्यासाठी सभा आयोजित करणे | २ गुण |
| | | ४. योग, व्यायाम, खेळास प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करणे | २ गुण |
| | | ५. शैक्षणिक सहली, व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व महापुरूषांच्या जयंती, पुण्यतिथी साजरी करणे. | २ गुण |
| | एकूण गुण १० | | |

| | | |
|---|---|---|
| मुद्दा क्रमांक १ चे | १० गुणांपैकी | गुण |
| मुद्दा क्रमांक २ चे | १० गुणांपैकी | गुण |
| मुद्दा क्रमांक ३ चे | १० गुणांपैकी | गुण |
| मुद्दा क्रमांक ४ चे | १० गुणांपैकी | गुण |
| मुद्दा क्रमांक ५ चे | १० गुणांपैकी | गुण |
| मुद्दा क्रमांक ६ चे | ५ गुणांपैकी | गुण |
| मुद्दा क्रमांक ७ चे | ५ गुणांपैकी | गुण |
| मुद्दा क्रमांक ८ चे | १० गुणांपैकी | गुण |
| मुद्दा क्रमांक ९ चे | १० गुणांपैकी | गुण |
| एकूण | ८० गुणांपैकी | गुण |

तपासणी अधिकारी स्वाक्षरी

**अभिप्राय** : वरील प्रमाणे गुण देवून एकूण गुणांच्या आधारे खालील प्रमाणे निष्कर्ष काढावा.

| | | |
|---|---|---|
| १) | ७५ गुणांपेक्षा जास्त गुण असल्यास | अ श्रेणी |
| २) | ६० ते ७५ गुण असल्यास | ब श्रेणी |
| ३) | ५० ते ५९ गुण असल्यास | क श्रेणी |
| ४) | ४९ किंवा त्यापेक्षा कमी गुण असल्यास | ड श्रेणी |

* * * * * *

163 118 132

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार

## शासन निर्णय क्र. पुरस्कार-२०१७/प्र.क्र.१९४/समन्वय, दि. १९ एप्रिल, २०१८ चे

## परिशिष्ट – ब

### अनुसूचित जातीच्या मुलांमुलींसाठी निवासी शाळा / आश्रमशाळा गुणवत्ता तपासणी निकष

अ) शासकीय संस्थेचे नांव व पत्ता :

ब) निवासी शाळा / आश्रमशाळा : शासकीय

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश स्थिती / पटसंख्या | १. मान्य संख्येच्या ९१% ते १००% प्रवेश देण्यात आल्यास | १० गुण |
| | | २. मान्य संख्येच्या ७५ ते ९०% प्रवेश देण्यात आल्यास | ८ गुण |
| | | ३. मान्य संख्येच्या ५१ ते ७४ % प्रवेश देण्यात आल्यास | ६ गुण |
| | | ४. मान्य संख्येच्या ५०% पर्यंत प्रवेश देण्यात आल्यास | ४ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| २ | इमारत | | |
| (अ) | भाड्याची इमारत | १. मान्य संख्येच्या प्रमाणात पुरेशी व सर्व सोयींनी युक्त असल्यास | १० गुण |
| | | २. मान्य संख्येपेक्षा प्रमाणात पुरेशी नाही परंतु सर्व सुविधायुक्त असल्यास. | ६ गुण |
| | | ३. मान्य संख्येच्या प्रमाणात पुरेशी नाही, सोयीसुविधांचा अभाव परंतु, सुधारणेस वाव असल्यास. | ४ गुण |
| | | ४. मान्य संख्येच्या प्रमाणात अपुरी, सोयी सुविधांचा अभाव तसेच सुधारणेस वाव नसल्यास. | २ गुण |
| (ब) | शासकीय इमारत | १. दुरूस्ती व रंगरंगोटी वेळेवर केली जात असल्यास. | ३ गुण |
| | | २. सर्व सोयीसुविधांनी युक्त (कॉट,टेबल, खुर्ची , डायनिंग टेबल इ.) | ३ गुण |
| | | ३. सर्व जागेचा वापर विहित कारणासाठी केला असल्यास | १ गुण |
| | | ४. सभोवतालची मोकळी जागा व परीसर सुशोभित (बागबगीचा, झाडे इत्यादी)असून, त्याची नियमितपणे निगा राखली जात असल्यास. | ३ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ३ | भोजन व्यवस्था | १. नियमानुसार वरण, भात, भाजी, पोळी, मिष्टान्न देत असल्यास. | १० गुण |
| | | २. नियमानुसार वरण, भात, भाजी, पोळी, मिष्टान्न या पैकी एक बाब कमी असल्यास. | ८ गुण |
| | | ३. नियमीत भोजनात भाजी व पोळी, किंवा भात व भाजी देत असल्यास. | ७ गुण |
| | | ४. भोजन अपुरे व नेहमीच भात किंवा पोळी भाजी देत असल्यास. | ५ गुण |
| | एकुण गुण १० | | |
| ४ | सोयी सुविधा | १. नियमानुसार सर्व सोयी सुविधा पुरविल्या असल्यास. | १० गुण |
| | | २. नियमानुसार सोयी सुविधांपैकी एखादी बाब कमी दिली असल्यास. | ८ गुण |
| | | ३. ५०% सोयी सुविधा पुरविल्या असल्यास. | ४ गुण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४. नियमानूसार ५०% पेक्षा कमी सोयी सुविधा देण्यात आल्यास. | ३ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ५ | अभिलेख (रेकॉर्ड) | १. रेकॉर्ड परिपूर्ण व उपलब्ध असल्यास. | ५ गुण |
| | | २. रेकॉर्ड उपलब्ध असून त्यामध्ये त्रुटी असल्यास. | ४ गुण |
| | | ३. रेकॉर्ड अपूर्ण व त्यामध्ये त्रुटी असल्यास. | ३ गुण |
| | | ४. रेकॉर्ड नसणे, अपुरी माहिती व त्रुटी आढळून असल्यास. | ० गुण |
| | एकुण गुण ५ | | |
| ६ | स्वच्छता | १. अतिउत्कृष्ट. | ५ गुण |
| | | २. उत्कृष्ट. | ४ गुण |
| | | ३. सर्वसाधारण. | २ गुण |
| | | ४. स्वच्छतेचा अभाव असल्यास. | ० गुण |
| | एकुण गुण ५ | | |
| ७ | ग्रंथालय / वाचनालय | १. अद्यावत ग्रंथालय, संदर्भ पुस्तके व अवांतर वाचन साहित्य असल्यास. | १० गुण |
| | | २. अवांतर वाचन साहित्य, अद्यावत ग्रंथालय आहे परंतु, साहित्य नसल्यास. | ८ गुण |
| | | ३. कमी साहित्य उपलब्ध असल्यास. | ६ गुण |
| | | ४. वाचन साहित्य, ग्रंथ पुरेसे नसल्यास. | ४ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ८ | इतर उपक्रम | १. खेळांच्या स्पर्धा आयोजित करणे. | २ गुण |
| | | २. निबंध, वकृत्व स्पर्धांचे आयोजन करणे. | २ गुण |
| | | ३. मान्यवरांचे मार्गदर्शन घेण्यासाठी सभा आयोजित करणे. | २ गुण |
| | | ४. योग, व्यायाम, खेळास प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करणे. | २ गुण |
| | | ५. शैक्षणिक सहली, व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व महापुरूषांची जयंती, पुण्यतिथी साजरी करणे. | २ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ९ | शैक्षणिक निकाल | १. ८० ते १००% निकाल. | १० गुण |
| | | २. ६० ते ७९ % निकाल. | ५ गुण |
| | | ३. ५० ते ५९ % निकाल. | ३ गुण |
| | एकूण गुण १० | | |

मुद्दा क्रमांक १ चे १० गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक २ चे १० गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ३ चे १० गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ४ चे १० गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ५ चे ५ गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ६ चे ५ गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ७ चे १० गुणांपैकी गुण

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार**
**शासन निर्णय क्र. पुरस्कार-२०१७/प्र.क्र.१९४/समन्वय, दि. १९ एप्रिल, २०१८ चे**

परिशिष्ट- क

**अनुसुचित जातीच्या मुलामुलींकरिता शासनमान्य अनुदानित वसतीगृह गुणवत्ता तपासणी निकष**

अ) संस्थेचे नांव व पत्ता :

ब) अनुदानित वसतीगृहाचे नांव व पत्ता :

क) वसतीगृहाचा प्रकार : अनुदानित

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश स्थिती | १. मान्य संख्येच्या ९१ ते १००% प्रवेश देण्यात आल्यास | १० गुण |
| | | २. मान्य संख्येच्या ७५ ते ९०% प्रवेश देण्यात आल्यास | ८ गुण |
| | | ३. मान्य संख्येच्या ५० ते ७४% प्रवेश देण्यात आला असल्यास | ६ गुण |
| | | ४. मान्य संख्येच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश देण्यात आला असल्यास | ४ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| २ | सरासरी उपस्थितीनुसार | १. मान्य संख्येच्या ८९% पेक्षा अधिक उपस्थिती असल्यास | १० गुण |
| | | २. मान्य संख्येच्या ७५ ते ८९ % उपस्थिती असल्यास | ८ गुण |
| | | ३. मान्य संख्येच्या ६० ते ७४% उपस्थिती असल्यास | ६ गुण |
| | | ४. मान्य संख्येच्या ५० ते ५९ % उपस्थिती असल्यास | ४ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ३ | इमारत | १. मान्य संख्येनुसार पुरेशी व सर्व सोयींनी युक्त इमारत, मुलीमुलींसाठी स्वतंत्र निवासाची सोय, स्वतंत्र स्वच्छतागृह, स्नानगृहे असल्यास. | १० गुण |
| | | २. मान्य संख्येनुसार इमारत पुरेशी नसेल परंतू सर्व सुविधांनी युक्त असल्यास. | ८ गुण |
| | | ३. मान्य संख्येनुसार इमारत पुरेशी नाही, सोयी सुविधांचा अभाव, परंतु, सुधारणेस वाव असल्यास. | ६ गुण |
| | | ४. मान्य संख्येनुसार अपुरी इमारत आणि सोयी सुविधा तसेच सुधारणेस वाव नसल्यास. | ४ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ४ | भोजन व्यवस्था | १. नियमानुसार वरण, भात, भाजी, पोळी, मिष्टांन्न देत असल्यास. | १५ गुण |
| | | २. नियमानुसार वरण, भात, भाजी, पोळी, मिष्टांन्न यापैकी एक बाब कमी असल्यास. | १० गुण |
| | | ३. नियमित भोजनात भाजी व पोळी किंवा भात व भाजी देत असल्यास. | ८ गुण |
| | | ४. भोजन अपुरे व नेहमीच भात किंवा पोळी भाजी देत असल्यास. | ५ गुण |
| | एकूण गुण १५ | | |
| ५ | सोयी सुविधा | १. नियमानुसार सोयी सुविधा पुरविल्या असल्यास. | १० गुण |
| | | २. नियमानुसार सोयी सुविधांपैकी एखादी बाब कमी असल्यास. | ८ गुण |
| | | ३. ५०% सोयी सुविधा पुरविल्या असल्यास. | ६ गुण |
| | | ४. नियमानुसार ५०% पेक्षा कमी सोयी सुविधा देण्यात आल्या असल्यास. | ४ गुण |
| | एकूण गुण १० | | |
| ६ | अभिलेख (रेकॉर्ड) | १. रेकॉर्ड परिपूर्ण व उपलब्ध असल्यास. | ५ गुण |
| | | २. रेकॉर्ड उपलब्ध असून त्यामध्ये त्रुटी असल्यास. | ३ गुण |
| | | ३. रेकॉर्ड अपूर्ण व त्यामध्ये त्रुटी असल्यास. | २ गुण |

| | | |
|---|---|---|
| मुद्दा क्रमांक ८ चे | १० गुणांपैकी | गुण |
| मुद्दा क्रमांक ९ चे | १० गुणांपैकी | गुण |
| एकूण | ८० गुणांपैकी | गुण |

तपासणी अधिकारी स्वाक्षरी

अभिप्राय : वरील प्रमाणे गुण देवून एकूण गुणांच्या आधारे खालील प्रमाणे निष्कर्ष काढावा.

| | |
|---|---|
| १) ७५ गुणांपेक्षा जास्त गुण असल्यास | अ श्रेणी |
| २) ६० ते ७५ गुण असल्यास | ब श्रेणी |
| ३) ५० ते ५९ गुण असल्यास | क श्रेणी |
| ४) ४९ किंवा त्यापेक्षा कमी गुण असल्यास | ड श्रेणी |

* * * * * *

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार

## शासन निर्णय क्र. पुरस्कार-२०१७/प्र.क्र.१९४/समन्वय, दि. १९ एप्रिल, २०१८ चे

## परिशिष्ट- इ

### खर्चाचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| १ | पुरस्कार विजेत्या संस्थेस रोख पुरस्कार. | अ) राज्य स्तर<br>१) प्रथम रू. ५.०० लाख<br>२) द्वितीय रू. ३.०० लाख<br>३) तृतीय रू. २.०० लाख<br>ब) विभागीय स्तर<br>१८ पुरस्कार<br>प्रत्येकी रू. १ लाख प्रमाणे<br>रु. १८ लाख |
| | पुरस्काराची एकूण रक्कम रूपये | रूपये २८ लाख |
| २ | वुलनची / हिमरू शाल | रु. १५,०००/- |
| ३ | पुरस्कार प्राप्त संस्थांना स्मृती चिन्ह | रू. ९३,०००/- |
| ४ | नारळ, पुष्पगुच्छ, हार इतर आकस्मिक खर्च | रू. ६५,०००/- |
| ५ | तीन दिवसांचा भोजन, अल्पोपहार, चहा यावरील खर्च | रू. ९७,००० /- |
| | **समारंभाचा सामाईक खर्च** | |
| ६ | प्रवास खर्च. | रू. ५०,०००/- |
| ७ | पुरस्कार विजेत्या संस्थांच्या प्रतिनिधींना शाही भोजन . | रू. ८,५०,०००/- |
| ८ | हॉल भाडे, रंगमंच सजावट, हॉल सजावट इ. | रू. १,५०,०००/- |
| ९ | लक्झरी बस भाडे, सरकारी वाहनाचे पेट्रोल, प्रेक्षणीय स्थळांना भेटी. | रू. १,५०,०००/- |
| १० | निवास व्यवस्था. | रू. ३,००,०००/- |
| | **एकूण रक्कम** | **४५,७०,०००/-** |

* * * * * *

169
120
135

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४. रेकॉर्ड नसणे, अपुरी माहिती व त्रुटी आढळुन आल्यास. | ० गुण |
| | एकूण गुण ५ | | |
| ७ | स्वच्छता, परिसर, भोजनगृह, स्वयंपाकगृह, क्रिडांगण, स्नानगृहे व स्वच्छतागृहे | १. अति उत्कृष्ट | ५ गुण |
| | | २. उत्कृष्ट | ४ गुण |
| | | ३. सर्वसाधारण | २ गुण |
| | | ४. स्वच्छतेचा अभाव असल्यास. | ० गुण |
| | एकूण गुण ५ | | |
| ८ | ग्रंथालय / वाचनालय | १. सुसज्ज ग्रंथालय / वाचनालय असल्यास. | ५ गुण |
| | | २. सर्वसाधारण साहित्य असल्यास. | ३ गुण |
| | | ३. ग्रंथालय / वाचनालय नसल्यास. | ० गुण |
| | एकूण गुण ५ | | |
| ९ | इतर शैक्षणिक उपक्रम | १. क्रिडांगण असणे, खेळाचे साहित्य, विविध खेळांच्या स्पर्धा आयोजित करणे, | ४ गुण |
| | | २. निबंध, वकृत्व स्पर्धा आयोजित करणे. | २ गुण |
| | | ३. इतर व्यक्तिमत्व विकास उपक्रम, मार्गदर्शनपर वर्ग आयोजित करणे, स्पर्धा परिक्षांची तयारी. | २ गुण |
| | | ४. सामाजिक उपक्रम, महापुरूषांची जयंती, पुण्यतिथी साजरी करणे. | २ गुण |
| | एकूण गुण १० | | |

मुद्दा क्रमांक १ चे १० गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक २ चे १० गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ३ चे १० गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ४ चे १५ गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ५ चे १० गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ६ चे ५ गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ७ चे ५ गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ८ चे ५ गुणांपैकी गुण
मुद्दा क्रमांक ९ चे १० गुणांपैकी गुण

-------------------------------------------

एकूण ८० गुणांपैकी गुण

---------------------------------- --------

तपासणी अधिकारी स्वाक्षरी

**अभिप्राय** : वरील प्रमाणे गुण देवून एकूण गुणांच्या आधारे खालील प्रमाणे निष्कर्ष काढावा.

१) ७५ गुणांपेक्षा जास्त गुण असल्यास — अ श्रेणी
२) ६० ते ७५ गुण असल्यास — ब श्रेणी
३) ५० ते ५९ गुण असल्यास — क श्रेणी
४) ४९ किंवा त्यापेक्षा कमी गुण असल्यास — ड श्रेणी

* * * * * *

१६८

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार
## शासन निर्णय क्र. पुरस्कार-२०१७/प्र.क्र.१९४/समन्वय, दि. १९ एप्रिल, २०१८ चे
## परिशिष्ट — ड
## पुरस्कारासाठी खर्चाची पध्दत

| अ.क्र. | बाब | तपशिल | |
|---|---|---|---|
| १ | पुरस्कार विजेता संस्थेस रोख बक्षिस. | राज्य स्तरीय प्रथम पुरस्कार | ५ लाख |
| | | राज्य स्तरीय द्वितीय पुरस्कार | ३ लाख |
| | | राज्य स्तरीय तृतीय पुरस्कार | २ लाख |
| | | विभाग स्तरीय पुरस्कार प्रत्येक महसुली विभागात, प्रत्येक प्रवर्गामधून प्रथम आलेल्या एका संस्थेस पुरस्कार (एकूण १८ पुरस्कार) | १ लाख प्रत्येकी |
| २ | पुरस्कार विजेत्या संस्थेच्या पदाधिका-यास प्रवास भत्ता. | या योजनेअंतर्गत पुरस्कार प्राप्त संस्थेचे अध्यक्ष / उपाध्यक्ष अथवा सचिव यांना संस्थेच्या नोंदणीकृत पत्त्यापासून ते समारंभाच्या स्थळापर्यंत रेल्वेचे पहिल्या वर्गाचे किंवा एस. टी. बसचे जाण्या - येण्याचे भाडे . | |
| ३ | इतर सवलती. | पुरस्कार विजेत्या संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संस्थेचे प्राधिकृत प्रतिनिधी हे पुरस्कार देण्याच्या ठिकाणी शासनाचे पाहुणे म्हणून राहतील. पहिल्या दिवशी आगमन व स्वागत, दुसऱ्या दिवशी पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करण्यात येईल. तिसऱ्या दिवशी पुरस्कार प्राप्त संस्थांच्या प्रतिनिधींना प्रेक्षणीय स्थळदर्शन / नामांकित सामाजिक संस्थांना भेटी असा कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. निवास, भोजन, प्रवास आणि स्थानिक वाहतुक खर्च शासनाकडून केला जाईल. | |
| ४ | सन्मानपत्र, शाल, साडी, खण. | पुरस्कार विजेत्या संस्थेच्या प्रतिनिधींना सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल किंवा साडी, (ब्लाऊज कापड), श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात येईल. | |
| ५ | इतर संकीर्ण आणि आकस्मिक खर्च. | निमंत्रण पत्रीका छपाई, हार, स्टेज, पुष्प गुच्छ, फर्निचर, हॉलचे भाडे, वाहतुक खर्च, छायाचित्रण, साधन सामुग्री, निवास, भोजन व अल्पोपहार इत्यादी खर्च शासन आदेश/नियम तसेच वित्तीय नियमानुसार केला जाईल. | |

* * * * * *

# अर्जाचा नमुना (संस्थेसाठी)

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

पुरस्काराचे नांव:-

वर्ष:-

जिल्ह्याचे नांव:-

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे पूर्ण नांव :- | |
| २. | संस्थेचा पुर्ण पत्ता :- | |
| ३. | संस्थेचा नोंदणी :-<br>१. संस्था नोंदणी अधिनियम, १८६०<br>२. मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०<br>वरील प्रमाणपत्रे प्रती सोबत जोडावी | |
| ४. | संबंधीत संस्थेचे कार्यक्षेत्र | |
| ५. | संस्थेच्या कार्यकारी मंडळातील अध्यक्ष/सचिव यांचे नांव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक - इत्यादी सविस्तर माहिती. | |
| ६. | सदर संस्थेविरुध्द अथवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला नसल्याबाबतचा जिल्हा पोलीस विभागाचा दाखला. | |
| ७. | संस्थेचा लेखापरीक्षणाचा तीन वर्षाचा अहवाल. | |
| ८. | संबंधीत संस्था सुरु झाल्याचा दिनांक | |

<table>
<tr><td>९.</td><td>जिल्हा दक्षता समितीचे शिफारस पत्र</td><td></td></tr>
<tr><td>१०.</td><td>संस्थेच्या घटनेची प्रमाणित प्रत व मागील ५ वर्षाचा वार्षिक अहवाल.</td><td></td></tr>
<tr><td>११.</td><td>सदर संस्थेस पुरस्कार मिळणेसाठी शिफारस केलेल्या सन्मानिय व्यक्तीचे नाव/पदनाम</td><td></td></tr>
<tr><td>१२</td><td>संस्थेचे वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचा तपशिल.<br>(प्रती सोबत जोडाव्या)</td><td></td></tr>
<tr><td>१३</td><td>संस्था माध्यमातून व्यक्तीगत अथवा सामूहिक सेवा दुर्बल घटकांना व मागासवर्गीयांसाठी घेत असलेले उपक्रम, असल्यास, कोणत्या स्वरुपात व त्यांनी घेतलेल्या उपक्रमांचा सविस्तर तपशिल.<br>(प्रती सोबत जोडाव्या)</td><td></td></tr>
<tr><td>१४.</td><td>समाज कल्याण क्षेत्रात मातंग समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अंधश्रध्दा निर्मुलन, जनजागृती इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय केलेली कामगिरीचा तपशील (साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे पुरस्कारासाठी)</td><td></td></tr>
<tr><td>१५.</td><td>समाज कल्याण क्षेत्रात चर्मकार समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्यायनिर्मुलन इत्यादी क्षेत्रात केलेल्या कामगीरीचा तपशील (संत रविदास पुरस्कारासाठी)</td><td></td></tr>
<tr><td>१६.</td><td>संस्थेने उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना शासना मार्फत किंवा विभिन्न संस्थेमार्फत सत्कार अथवा पारितोषिक मिळाले असल्यास त्याचा तपशिल.</td><td><table>
<tr><th>अ.क्र</th><th>पारितोषिका चे नांव</th><th>कोणामार्फत देण्यात येतो.<br>( संस्था/ विभाग)</th><th>वर्ष दिनांक</th></tr>
<tr><td>१</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>३</td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१७.</td><td>भूमीहीन शेत मजुर व कामगारांसाठी केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कारासाठी)</td><td></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १८. | संस्थेचा सार्वजनिक क्षेत्रातील एकूण अनुभव | |

टिप : प्रत्येक पुरस्कारासाठी स्वतंत्र अर्ज करावा, एका वर्षात एकाच पुरस्कारासाठी विचार केला जाईल.

दिनांक : / /२०२२

(संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांचे स्वाक्षरी व नांव )
संस्थेचा शिक्का

**कार्यालयीन उपयोगासाठी:-**

प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/ सहायक आयुक्त, समाजकल्याण / जिल्हा दक्षता समितीचे अभिप्राय / शिफारस----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग

सहायक आयुक्त, समाज कल्याण